क्रमांक सीएसएल २०१३/प्र.क्र.८२६/१५स,
सहकार, पणन व वस्त्रोदयोग विभाग,
शिबीर कार्यालय, नागपूर,
दिनांक — १६/१२/२०१३.

**विषय :— महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७९ अन्वये विवरणपत्रे दाखल करणेबाबत.**

**परिपत्रक**

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७९ (१A अन्वये प्रत्येक सहकारी संस्थेने वित्तीय वर्ष समाप्त झाल्यानंतर सहा महिन्याच्या आत संबंधित निबंधकास किंवा त्याने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याकडे खालील विवरणपत्रे दाखल करणे बंधनकारक आहे.

अ) संस्थेच्या कार्याचा वार्षिक अहवाल.
ब) संस्थेच्या लेख्यांची लेखापरिक्षित विवरणे.
क) संस्थेच्या सर्वसाधारण सभेने मान्यता दिल्याप्रमाणे शिल्लक रकमेचा विनियोग करण्यासाठीच्या योजना.
ड) संस्थेच्या उपविधीच्या सुधारणांची यादी (असल्यास)
इ) संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा घेण्याची तारीख व नियत असेल तेथे निवडणुक घेण्याच्या दिनांका संबंधात प्रतिज्ञापन.
फ) अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदीनुसार निबंधकास आवश्यक वाटेल अशी इतर माहीती.

कलम ७९ (१B) नुसार प्रत्येक सहकारी संस्थेने शासनमान्य नामिकेतुन सर्वसाधारण सभेच्या मान्यतेनुसार नियुक्त केलेल्या लेखापरीक्षकाचे किंवा लेखापरीक्षण व्यवसाय संस्थेचे (Firm) नाव व त्याचे लेखी संमतीपत्र याबाबतचे विवरण वार्षिक सर्वसाधारण सभेच्या दिनांकापासून एक महिन्यात निबंधकास सादर करणे आवश्यक आहे.

कलम ७९ (१A) व कलम ७९ (१B) नुसार विवरणपत्रे सादर करणेबाबत खालीलप्रमाणे सुचना निर्गमित करण्यात येत आहेत.

**विवरणपत्रे सादर करण्याबाबतची कार्यपध्दती**

विवरणपत्रांचे नमुने सहकार विभागाच्या https://www.mahasahakar.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर इलेक्ट्रॉनिक स्वरूपात उपलब्ध करून दिलेली आहेत. प्रत्येक सहकारी संस्थेने संकेतस्थळावरील या विवरणपत्रात माहीती अचुकरीत्या भरून ही सर्व विवरणपत्रे या संकेतस्थळाव्दारे संबंधित निबंधकास प्रत्येक वर्षी दि. ३० सप्टेंबर पर्यत इलेक्ट्रॉनिक स्वरूपात सादर (अपलोड) करावयाची आहे. तसेच

कलम ७९ (१B) मधील माहीती संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेनंतर एक महिन्यात वरील संकेतस्थळाव्दारे संबंधित निबंधकास सादर (अपलोड) करावयाची आहे.
याबाबत अधिक स्पष्ट करण्यात येते की, सहकारी संस्थांनी वरील सर्व विवरणपत्रे विभागाच्या संकेतस्थळावरच इलेक्ट्रॉनिक स्वरूपात सादर (अपलोड) करावयाची असून संकेतस्थळावर विवरणपत्रे सादर ने केल्यास संस्थेने विवरणपत्रे सादर केलेली नाहीत, असे गृहीत धरण्यात येईल.

ज्या सहकारी संस्था विवरणपत्रे विहीत नमुन्यामध्ये व विहीत मुदतीत विभागाच्या संकेतस्थळावर सादर (अपलोड) करणार नाहीत. अशा संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ CA, 146 (G) & 147 (G) अन्वये कारवाईस पात्र ठरतील. कलम ७३ CA मध्ये समिती आणि तिच्या सदस्यांच्या अपात्रतेबाबत तरतुद असून कलम १४६ (G) नुसार चुकीचे विवरणपत्र दाखल करणे अथवा कलम ७९ नुसार विवरणपत्र दाखल न करणे हा गुन्हा ठरविण्यात आला आहे. कलम १४७ G नुसार या गुन्हयासाठी रूपए ५०००/— पर्यंत दंडाच्या शिक्षेची तरतुद आहे.

**विवरणपत्रांची छाननी**

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७९ (४) अनुसार निबंधकाने अथवा त्याने प्राधिकृत केलेल्या अधिका—याने सदर विवरणपत्रांची छाननी करून त्यानुसार आवश्यक ती कार्यवाही करावयाची आहे. कलम ७९ (१A) मधील अ,ब व क मधील विवरणपत्रांची निबंधकाच्या वतीने प्राधिकृत केलेल्या संबंधित लेखापरीक्षकाने छाननी करून त्याबाबतचा अहवाल स्वंयस्पष्ट अभिप्रायासह संबंधित तालुक्याचे लेखापरीक्षक यांनी, जिल्हा स्तरीय संस्थांच्या बाबतीत जिल्हा विशेष लेखापरीक्षक यांनी, विभागीय संस्थांच्या बाबतीत अप्पर निबंधक, सहकारी संस्था (लेखापरीक्षण) यांनी करावयाचे आहे. साखर आयुक्त, पणन संचालक, संचालक हातमाग, यंत्रमाग व वस्त्रोदयोग तसेच आयुक्त पशुसंवर्धन व आयुक्त दुग्ध विकास यांच्या अखत्यारीतील संस्थांच्या बाबतीत ही छाननी संबंधित लेखापरीक्षकांनी करावयाची आहे. उर्वरीत ड, इ व फ मधील विवरणपत्रांची छाननी संबंधित निबंधक त्यांचे स्तरावर करतील. छाननी केल्यानंतर निबंधकाने कलम कलम ७३ CA, 146 (G) & 147 (G) नुसार संबंधित संस्थेवर आवश्यक ती कायदेशीर कार्यवाही करावी.

कलम ७९ (१बी) अनुसार शासनमान्य नामिकेवरील लेखापरीक्षकांची नेमणूक व त्यांची लेखी संमती याबाबतचे विवरणपत्र संस्थेने वार्षिक सर्वसाधारण सभा झाल्यानंतर एक महिन्याचे आत दाखल करणे बंधनकारक आहे. त्यानुसार संस्थेने कार्यवाही न केल्यास निबधकाने दि. ३० नोव्हेंबर पर्यंत महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८१ (१)(A) नामिकेवरील लेखापरीक्षकाची नियुक्ती करावी व सदरची नियुक्ती आदेश विभागांच्या संकेतस्थळावर सादर (अपलोड) करावा.
वरील सुचनांचे सर्व संबंधितानी काटेकोरपणे पालन करून योग्य ती कार्यवाही करावी.

राजगोपाल देवरा
सचिव (सहकार), महाराष्ट्र शासन

**प्रत माहितीस्तव सादर**

१. मा. मंत्री (सहकार) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय मुंबई
२. मा. मंत्री (कृषी व पणन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय मुंबई
३. मा. मंत्री (वस्त्रोदयोग) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय मुंबई
४. मा. मंत्री (पशुसंवर्धन व दुग्ध विकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय मुंबई
५. मा. राज्यमंत्री, (सहकार, पणन व वस्त्रोदयोग) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय मुंबई

**प्रत आवश्यक त्या कार्यवाहीसाठी**

१. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य पुणे.
३. आयुक्त, दुग्ध विकास, मुंबई.
४. आयुक्त, पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य पुणे.
५. संचालक, हातमाग, यंत्रमाग व वस्त्रोदयोग, महाराष्ट्र राज्य, नागपूर.
६. पणन संचालक, महाराष्ट्र राज्य पुणे.
७. विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था (सर्व)
८. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था लेखापरीक्षण (सर्व)
९. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, (सर्व)
१०.जिल्हा विशेष लेखापरीक्षक, सहकारी संस्था (सर्व)
११.उप/सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, (सर्व)